# स्वार्थ=भास

पेरले न फोफावले तण तरीही तिरस्काराचे
घातले न कडाडले घण तरीही घृणा निंदेचे
कळे न कसे भेदभावाचे बीज मनात पडले
काटेरी बाभूळ तरूसम ते जोमात तरारले ||१||

घाली घाला मागून केसरी चाहूल लागू न देता
मृगावरी तसा मना झडपे स्वार्थ कळू न देता
वापरून काम क्रोध लोभ अहंता अशी शस्त्रे
करी हरण हर प्राण्याची सद्गुणरूपी तो वस्त्रे ||२||

नग्नावस्थेत पर्वा न करता अवती भोवतीची
ठाण मांडूनी बैसलो मी सरीता तटी वृक्षाखाली
लागे ध्यान शांतावलो श्वास ऊरी भरुनी सोडूनी
उमगले तेव्हा मला भेदाभेद भासच असती ||३||

– नारायण
१०/२७/२३